राजीनामा मंजुर करणे बाबत.
श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा)
पंचायत समिती अहिल्यानगर

जिल्हा परिषद अहिल्यानगर

अर्थ विभाग

जिल्हा परिषद आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/१३१ /२०२५

अहिल्यानगर दिनांक ०१ /०४/२०२५

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/ प्र.क्र.३३/९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७

२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र.अर्थ/कार्या१/आस्था१/७९/२०२५ दिनांक २८/०२/२०२५

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर, यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/ आस्था-१/२४२/२०२५ दिनांक ०७/०३/२०२५ व सहपत्रातील श्रीम.पाडळे,क.स.ले.यांचा राजीनामा दिनांक ०५/०३/२०२५

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर, यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/ आस्था-१/३००/२०२५ दिनांक २१/०३/२०२५

ज्याअर्थी, श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) पंचायत समिती अहिल्यानगर जि.अहिल्यानगर यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा), या पदाचा राजीनामा दिनांक ०५/०३/२०२५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भ क्रमांक ३ अन्वये मंजुरीस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) पंचायत समिती अहिल्यानगर या इकडील संदर्भ क्रमांक २ मधील नियुक्ती आदेशा अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर दिनांक ०४/०३/२०२५ रोजी पंचायत समिती अहिल्यानगर येथे हजर झालेल्या आहेत. श्रीम. पाडळे यांनी कनिष्ठ सहाय्यक(लेखा) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक ०५/०३/२०२५ रोजी दिला असुन संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच संदर्भ क्रमांक ४ अन्वये कार्यालय प्रमुखांनी श्रीम. पाडळे यांचे एक महिन्याचे मुळ वेतन संबधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत सादर केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ४ अन्वये श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) पंचायत समिती अहिल्यानगर, यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेने व कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित नसलेबाबतचा अहवाल प्राप्त झालेले आहे.तसेच त्यांचे मुळ वेतन संबधित लेखाशिर्षाखाली भरणा केलेची प्रत प्राप्त झालेली आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक ३ च्या अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) पंचायत समिती अहिल्यानगर, यांनी दिलेल्या कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाच्या राजीनाम्यास मान्यता देत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४०१०५००१६ असा आहे.सदरचा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 14:08:31

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम. सोनल संदिप पाडळे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा), पंचायत समिती अहिल्यानगर

द्वारा व प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

२/- सदर आदेशाची नोंद श्रीम. पाडळे यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. सदर आदेश श्रीम. पाडळे यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी. श्रीम. पाडळे यांचेकडे कोणत्याही प्रकारे थकबाकी/ येणेबाकी नसल्याची खात्री करुन आदेशाची अंमलबजावणी करावी.

प्रत - मुळ नस्ती.